# महिला सबलीकरण आणि ग्रंथालये

**अर्चना कांबळे,** M.Com, M.Lib, NET, SET महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय मार्केट यार्ड, कोल्हापूर

---

**प्रस्तावना :**

आजच्या काळात महिला सबलीकरण ही अत्यंत गुंतागुंतीची , बहुआयामी संकल्पना आणि विस्तृत चर्चेचा विषय आहे. लैंगिक असमता ठरवण्याचा अमानुष खेळ आहे. इतिहास साक्षी आहे की, मुळातच भारतीय महिला हि कधी अबला नव्हतीच. भारत हा नवदुर्गेची पूजा करणारी संस्कृती मानणारा देश आहे. प्रत्येक यशस्वी पुरुषामागे एका स्त्रीचा सहभाग असतो. हे आपण इतिहासापासुन ते वर्तमानातही अनुभवत आहोत. त्यामुळे अनेकांचे आधारवड असलेल्या मातृशक्तीला अधिकाधिक सुदढ आणि सक्षम बनवणे हि समाजाची जबाबदारी आहे.

**महिला सबलीकरण :**

स्त्रियांचा विकास घडवणे आणि त्यांना सामाजिक, राजकिय व आर्थिक स्वरुपाचा न्याय प्रदान करणे तसेच त्याना आपले मत प्रकट करण्याची संधी देऊन त्यांच्या स्वातंत्र्य, उपासना, धर्म, श्रद्धा आणि इतर गोष्टींचा आदर करणे व त्यांना प्रत्येक ठिकाणी समान संधी बहाल करणे म्हणजे महिला सक्षमीकरण होय आणि हया सक्षमीकरणातुन त्यांना एकटयाने सर्व कामे करणे व कारभार सांभाळणे याची संधी देणे म्हणजे सबलीकरण होय.

महिला सबलीकरण हे पुढील मानकांच्या आधारे करता येईल.

१) स्त्रिला स्वत: बद्दलची जाणीव करुन देणे

२) निर्णय घेण्याचा व पर्याय निवडण्याचा अधिकार

३) संधी व संसाधनांपर्यंत पोहचण्याचा अधिकार

४) घर आणि घराबाहेर स्वप्रतिमा तयार करणे

**ग्रंथालय :**

पूर्वीच्या काळापासूनच ग्रंथालय समाजाचे एक अविभाज्य घटक मानला जातो. ग्रंथालय शैक्षणिक , राजकिय, आर्थिक, सामाजिक मनोरंजनपर माहितीची गरज भागविण्याचे एक महत्वाचे केंद्र आहे. महिला सबलीकरणातही ग्रंथालयाचे महत्वाचे स्थान असल्याचे म्हणू शकतो. ग्रंथालयात महिलांना वाचनीय वेगवेगळे साहित्य राहते यात महिलाविषयी वेगवेगळी मासिके, जर्नलस, जनरल नॉलेज, आरोग्यपर, कविता, थोर व्यक्तींची चरित्रे, संत साहित्यपर साहित्य कथा, कादंबरी, नाटके, कविता, व्यक्तिमत्व विकास इ. तसेच वर्तमानपत्रे इ वाचनीय साहित्यांचा वापर करुन स्त्रिया आपल्या व्यक्तिमत्वात बदल घडवून आणू शकतात. घरातील स्त्रिया जर शिक्षित झाल्या तर संपुर्ण घराला त्या शिक्षित करु शकतात.

ग्रंथालय ही ज्ञान केंद्र असून ती आता फक्त पुस्तके किंवा ग्रंथाचा साठा असणारी एक इमारत नसून वेगवेगळया विषयाच्या माहितीचा साठा असणारे एक ज्ञान भंडार आहे. रोज नविन माहितीची निर्मिती होत आहे. या माहितीचा प्रसार संशोधनास चालना देण्यास वाचन संस्कृती जोपासणे यासाठी ग्रंथालये महत्वाची भूमिका बजावत आहे.

महिला शिक्षण आणि ग्रंथालय :

आजच्या काळात स्त्रिया सर्वच क्षेत्रात वावरताना दिसून येत आहेत. आज समाजात ग्रंथालय आणि शिक्षण यांचे समिकरण झालेले आहे. प्रत्येक शैक्षणिक संस्थांमध्ये ग्रंथालय अनिवार्य आहेच पण शैक्षणिक संस्था व्यतिरिक्त अनेक ग्रंथालये स्थापन झाली आहेत.अनेक प्रकारच्या ग्रंथालयाच्या माध्यमातून महिला स्वत:चा विकास घडवून आणत आहे.

**१)सार्वजनिक ग्रंथालये व महिला:**

सार्वजनिक ग्रंथालय म्हणजे शिक्षण, संस्कृती, माहिती आणि शांतता प्रस्थापित करणारी तसेच नागरिकांमध्ये व विविध देशांमध्ये सामंजस्य निर्माण करणारी अत्यावश्यक संस्था होय. सार्वजनिक ग्रंथालये ही आपल्या परिसरातील महिलांकरिता वेगवेगळया कार्यक्रमाचे आयोजन करु शकतो. सर्वप्रथम एक उदबोधक कार्यक्रम घेऊन महिलांना सविस्तर माहिती देणे जसे की, ग्रंथालयातील पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे ग्रंथालयाचे नियम यांची प्राथमिक पुस्तके, मासिके, कथा, कादंबरी नाटक बघून त्यांना सुद्धा वेगवेगळया पुस्तक वाचनांची आवड निर्माण होऊ शकेल. एकदा का वाचनाची आवड निर्माण झाली की, आपला रिकामा वेळ वाया न घालवता वाचत राहणे हा छंद बनतो. यातुन त्यांच्यामध्ये सकारात्मक विचार करण्याची ताकद निर्माण होते. स्वत:चे निर्णय घेण्यास सक्षम बनू शकतात. ग्रंथालयाचे सभासदत्व असलेल्या माहिलांना वेगवेगळे कार्यक्रम राबवून त्यांना सक्षम करता येणे शक्य होऊ शकेल.

**आरोग्य विषयक कार्यक्रम :**

स्त्रियांना त्यांच्या आरोग्याविषयी गैरसमज दूर करुन योग्य ती माहिती देणे

**सेमिनार व्याख्याने :**

एखादया रोजगारविषयी कार्यक्रम घेऊन त्यांच्या विकासासाठी स्वयंसेवी कार्यक्रम रोजगार व तांत्रिक शिक्षण बचत गटाची निर्मिती अनेक छोटे व्यवसाय कशा प्रकारे करु शकतील याचे मार्गदर्शन करु शकतो.

**कार्यशाळा व परिसंवाद:**

महिलांना घरबसल्या पिशव्या तयार करणे बॅग बनविणे, ज्वेलरी तयार करणे यासारख्या कार्यशाळा घेऊन त्यांना सक्षम बनवू शकतो.

**स्पधेचे आयोजन :**

ग्रंथालय सदस्य महिलांकरिता वेगवेगळया स्पर्धेचे आयोजन करणे जसे वाचन स्पर्धा, मेहंदी, रांगोळी स्पर्धा, हस्तकला स्पर्धा, पाककला स्पर्धा, कविता, अशा अनेक प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन करुन त्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्याचा प्रयत्न केला जाऊ शकतो.

हळदी- कुंकवाच्या कार्यक्रमात चरित्रात्मक , ऐतिहासिक, बोधात्मक पुस्तकांचे मोफत वाटप करणे

**महाविद्यालयीन व विद्यापीठीय ग्रंथालये व महिला**

महाविद्यालय व विद्यापीठीय ग्रंथालयामार्फत माहिलांना उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहित केले जाऊ शकते. हयामध्ये महिलांना व्यवसाय मार्गदर्शन स्पर्धा परीक्षांविषयी माहिती देणे, चर्चासत्रे आयोजित करणे. महिला प्राध्यापक व विद्यार्थिनीच्या संशोधन वृत्तीला चालना देणे, इंटरनेटच्या माध्यमातून विविध सेवा पुरविणे. हयामुळे महिला आत्मनिर्भर होण्यास मदत होऊ शकते.

**डिजिटल ग्रंथालय व महिला :**

नविन ग्रंथालयाचे स्वरुप हे संगणकिय होते आंतरजालाच्या सहाय्याने विविध माहितीचा शोध घर बसल्या किंवा ऑफिसमध्ये बसून देखील महिला हवी ती माहिती मिळवू शकतात. कार्पोरेट इंडस्ट्री क्षेत्रामध्ये स्वतंत्र ग्रंथालये तेथील महिला व्यवस्थापक, अधिकारी , इंजिनिअर्स यांच्यासाठी उपलब्ध असतात.

अशा प्रकारे महिला जर शिक्षित झाल्या तर त्यांचा संसारात, समाजात, देशाला सबळ होण्यास महत्वाची भूमिका असू शकते.

**निष्कर्ष :**

कोणत्याही राष्ट्राच्या विकासात तेथील मानव संसाधनाच्या विकासात ग्रंथालयाचे स्थान महत्वाचे आहे. जगाच्या कानाकोपऱ्यातून म्हणजे कोणत्याही प्रकारची माहिती मिळविण्याचे एक स्त्रोत म्हणजे ग्रंथालय आहे आणि ग्रंथालयातून विविध प्रकारच्या सेवा प्रदान केल्या जातात. महिला सबलीकरणातही ग्रंथालयांची महत्वाची भूमिका आहे कारण महिलांना स्वत: सक्षम करण्याकरिता कुटुंबाला समुदायाला विकसित करण्याकरिता मदत करते. ग्रंथालयातून पुस्तकी माहिती तसेच नविन तंत्रज्ञानाची ओळख झाल्यामुळे महिला त्या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून आत्मनिर्भर होतात. व त्यांचे सबलीकरण केले जाऊ शकते.

**संदर्भ सूची :**

१) गुप्ता कमलेश कुमार : महिला सशक्तीकरण, बुक एककलेल जयपुर
२) P. K. SAST- Role of Public Library on woman Empowerment www.losrjournals.org
३) https: www.in marathiiol woman empowerment in formation